# मेट्रोचे पाच किमी भुयारीकरण पूर्ण

## १५ टनेल यंत्रे मुंबईत; ८ यंत्रे पूर्णतः कार्यान्वित



म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो ३ प्रकल्पातील पाच किलोमीटर लांबीच्या भुयारीकरणाचे काम आत्तापर्यंत पूर्ण झाल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने जाहीर केले.

भुयारी मेट्रो प्रकल्पासाठी विविध ठिकाणी टीबीएम यंत्रे भूगर्भात सोडून भुयारीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. मेट्रो ३ प्रकल्पासाठी एकूण १७ टीबीएमची आवश्यकता असून या सर्व टीबीएमची कारखान्यात यशस्वी चाचणी करण्यात आली आहे. त्यापैकी १५ यंत्रे मुंबईत दाखल झाली असून आठ यंत्रे पूर्णतः कार्यन्वित झाली आहेत. अजून तीन यंत्रे भूगर्भात सोडण्याचे काम सध्या सुरू आहे. दोन यंत्रे जुलै महिन्याच्या अखेरीस भूगर्भात सोडण्यात येतील. उर्वरीत यंत्रे सप्टेंबरपर्यंत उतरविण्यात येतील. सर्व १७ यंत्रे ऑक्टोबर २०१८ अखेरीस कार्यन्वित होणे अपेक्षित आहे.

**भुयारीकरणाचे काम सुरू झाल्यापासून एक वर्षाच्या आतच पाच किमी लांबीच्या भुयाराचे काम पूर्ण झाले आहे. सर्वांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले आहे. प्रकल्प कामात सातत्याने सहकार्य करणाऱ्या मुंबईकरांचे त्यांनी आभार.**

– **अश्विनी भिडे**, व्यवस्थापकीय संचालिका, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन

### भुयारीकरणाची प्रगती

**आझाद मैदान :** येथून पॅकेज २ मधील वैतरणा १ आणि २ या यंत्रांनी १०५० मीटरचे भुयारीकरण पूर्ण केले आहे. या यंत्रांद्वारे ग्रँट रोड पर्यंत ४.५ किमी चे भुयार तयार करायचे आहे.

**नयानगर :** येथून पॅकेज ४ मधील कृष्णा १ आणि २ या यंत्रांनी २१६४ मीटरचे भुयार पूर्ण केले आहे. दादर मेट्रो स्टेशनपर्यंत २.५ किमीचे भुयार तयार करायचे आहे.

**विद्यानगरी :** येथून पॅकेज ५ मधील गोदावरी १ आणि २ या यंत्रांनी १०७३ मीटरचे भुयारीकरण पूर्ण केले आहे. आंतरदेशीय विमानतळ स्टेशन पर्यंत २.९८ किमी भुयार तयार करायचे आहे.

**मरोळ नाका :** येथून पॅकेज ७ मधील वैनगंगा १ आणि २ या यंत्रांनी ८९६ मीटरचे भुयारीकरण पूर्ण केले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशनपर्यंत १.२ किमीचे भुयार तयार करायचे आहे.